



दैनिक

# अट्टल संकेत

ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com

RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३३७ ■ गुरूवार, दि. १० एप्रिल २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -337 ■ Thursday, 10 April 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-


## २६/११ च्या अतिरेकी हल्ल्याचा सूत्रधार तहव्वूर राणाच्या भारत मुसक्या आवळणार

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

मुंबईत २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या अतिरेकी हल्ल्याचा सूत्रधार तहव्वूर राणा याला २४ तासांच्या आत भारतात आणले जाणार आहे. अमेरिकेतून विशेष विमानाने त्याला भारतात आणले जाईल. यानंतर २६/११ च्या अतिरेकी हल्ल्याप्रकरणी भारतीय पथक त्याची कसून चौकशी करणार आहे. भारतीय न्यायालयात त्याच्याविरोधात खटला चालवला जाणार आहे. या खटल्यात दोषी आढळल्यास तहव्वूर राणाला कठोरात कठोर शिक्षा दिली जाण्याची शक्यता आहे.



भारताकडे हस्तांतरण होऊ नये यासाठी तहव्वूर राणाने अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात याचिका केली होती. ही याचिका फेटाळण्यात आली आहे. याआधी मार्चमध्येही त्याने केलेली याचिका फेटाळण्यात आली होती. यानंतर तहव्वूर राणाला भारतात आणण्याची कारवाई सुरू झाली. या कारवाईवर स्थगिती आणण्यासाठी अखेरचा प्रयत्न म्हणून तहव्वूर राणाने अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात याचिका केली होती. पण त्याची स्थगितीची मागणी फेटाळण्यात आली. एबडोमिनल ऑर्टिक एन्युरिझम, पार्किंसन आणि मूत्रशयाच्या कर्करोग असे तीन गंभीर आजार झाल्याचे कारण देत तहव्वूर राणाने अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. भारताकडे हस्तांतरित करण्याची कारवाई स्थगित करावी, अशी मागणी त्याने केली होती. पण अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने तहव्वूर राणाची स्थगितीची मागणी फेटाळली. या निर्णयामुळे तहव्वूर राणाला भारतात आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार तहव्वूर राणाला विशेष विमानाने २४ तासांत भारतात आणले जाणार आहे. फेब्रुवारीत पंतप्रधान मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट झाली होती. या भेटीनंतर घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत तहव्वूर राणाला भारताकडे हस्तांतरित करण्याचे संकेत अमेरिकेने दिले होते. तहव्वूर राणा हा पाकिस्तानी-अमेरिकन अतिरेकी डेव्हिड कोलमन हेडलीचा सहकारी आहे, जो २००८ मध्ये मुंबईवर झालेल्या २६ नोव्हेंबरच्या हल्ल्यातील प्रमुख सूत्रधारांपैकी एक होता. तो पाकिस्तानी वंशाचा व्यापारी, डॉक्टर आणि इमिग्रेशन उद्योजक आहे. त्याचे लष्कर-ए-तोयबा या अतिरेकी संघटनेशी तसेच पाकिस्तानची गुप्तहेर संघटना आयएसआयशी संबंध असल्याचे समजते. अमेरिकेच्या ज्युरीने राणाला हल्ल्यांना भौतिक मदत पुरवल्याच्या आरोपातून ठोस पुराव्यांअभावी मुक्त केले होते. पण त्याला इतर दोन आरोपांमध्ये दोषी ठरवण्यात आले होते. तहव्वूर राणाला दहा वर्षांपेक्षा जास्त कालावधीची तुरुंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली होती. कोविड काळात तब्येत बिघडू लागल्याचे पाहून त्याला तुरुंगातून सोडण्यात आले. नंतर भारताच्या ताब्यात देण्यासाठी अमेरिकेने तहव्वूर राणाला पुन्हा अटक केली. राणाने भारताच्या ताब्यात दिले जाऊ नये यासाठी कायदेशीर प्रयत्न केले. पण अमेरिकेच्या न्यायालयाने त्याची भारताच्या ताब्यात देऊ नये ही मागणी फेटाळून लावली.

## ममतांचा थयथयाट! म्हणे, पं. बंगालमध्ये वक्फ कायदा लागू करणार नाही

**कोलकाता (वृत्तसंस्था)**

केंद्र सरकारने नुकताच पारित केलेला वक्फ बोर्ड सुधारणा कायदा पश्चिम बंगालमध्ये लागू करणार नाही, अशी घोषणा मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केली. कोलकाता येथे आज, बुधवारी आयोजित जैन समाजाच्या कार्यक्रमात त्यांनी ही घोषणा केली.

याप्रसंगी ममता बॅनर्जी म्हणाल्या की, केंद्राचा वक्फ सुधारणा कायदा पश्चिम बंगालमध्ये लागू केला जाणार नाही. मी अल्पसंख्याक लोकांचे आणि त्यांच्या मालमत्तेचे रक्षण करेन. मला माहित आहे की तुम्ही वक्फ कायद्याच्या अंमलबजावणीवर नाराज आहात. पण विश्वास ठेवा की, बंगालमध्ये कोणीही फूट टाकून राज्य करू शकणार नाही. वक्फ दुरुस्ती विधेयक आता मंजूर व्हायला नको होते.



वक्फ दुरुस्ती विधेयक गेल्या गुरुवारी लोकसभेत आणि शुक्रवारी राज्यसभेत मंजूर झाले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शनिवारी या विधेयकाला मान्यता दिली. या कायद्याच्या बाजूने सरकारचा युक्तिवाद असा आहे की त्यामुळे जमिनीशी संबंधित वाद कमी होतील. वक्फ बोर्डाचे काम कार्यक्षम, पारदर्शक आणि जबाबदार असेल.

दुसरीकडे, बंगालमधील मुर्शिदाबादमध्ये वक्फ सुधारणा कायद्याच्या विरोधात झालेल्या निदर्शनादरम्यान मंगळवारी हिंसाचार उसळला. मुर्शीदाबादमध्ये बीएनएसएसच्या कलम १६३ अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले. सार्वजनिक ठिकाणी ५ किंवा त्याहून अधिक लोकांना एकत्र येण्यास मनाई असेल. आदेशानुसार, प्रतिबंधात्मक आदेश ४८ तासांसाठी लागू राहील. दरम्यान, जांगीरपूर परिसरात सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे.

दरम्यान भाजपाने मुख्यमंत्री ममता बॅनर्जी कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात अपयशी ठरल्या आहेत. पश्चिम बंगाल विधानसभेतील विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी यांनी ट्विटरवर (एक्स) एक व्हिडिओ पोस्ट केला. यामध्ये त्यांनी दावा केला की काही समाजकंटक सार्वजनिक मालमत्ता जाळत आहेत. ते पोलिसांची वाहने जाळण्यात व्यस्त आहेत. निषेधाच्या नावाखाली अराजकता पसरवली जात आहे. त्या अधिकाऱ्याने बंगाल सरकारवर व्होट बँकेचे राजकारण करण्याचा आरोप केला. सुवेंदू अधिकारी यांनी या भागात केंद्रीय दल तैनात करण्याची मागणी केली आणि राज्याचे मुख्य सचिव आणि केंद्रीय गृह मंत्रालयाला हस्तक्षेप करण्याचे आवाहन केले आहे.

## नागपूरमध्ये फटाक्याच्या गोदामाला भीषण आग

**नागपूर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

नागपूर मधून मोठी बातमी समोर आली आहे. नागपूर मधील फटाक्यांच्या गोदामाला भीषण आग लागल्याची बातमी समोर आली आहे. ही आग आज (दि ९) दुपारच्या सुमारास लागली. आग इतकी तीव्र होती की सतत होणाऱ्या स्फोटांमुळे संपूर्ण परिसर हादरला आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले. मिळालेल्या माहितीनुसार, आज (दि ९) दुपारी तीनच्या दरम्यान नागपूर मधील वैशालीनगर येथे असलेल्या फटाक्याच्या गोदामातून फटाक्यांचा आवाज आणि आगीचे लोट दिसू लागले. रहिवाशांनी याची माहिती अग्निशमन दलाला दिली.अग्निशमन दलाच्या गाडया घटनास्थळी पोहोचल्या. स्फोटांच्या भीतीने पोलिसांनी गोदामाच्या आजुबाजूचा परिसर तातडीने सील केला. आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलाचे शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. या आगीत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसून वित्तहानी मोठ्या प्रमाणावर झाली आहे. दरम्यान पोलीस ही आग कशामुळे लागली असेल याची अधिक चौकशी करत आहेत.

## सोलापूर हादरलं! विठुरायाचं दर्शन घेऊन आले अन् भर रस्त्यात दाम्पत्यावर गोळीबार

सोलापूर : सोलापूर जिल्ह्यात मन हादरवून टाकणारी घटना घडली आहे. पूर्व वैमनस्यातून पती-पत्नीवर गोळीबार केल्याची धक्कादायक घटना येवती, ता. मोहोळ येथे मंगळवार ता. ८ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता येवती- रोपळे मार्गावर घडली. शिवाजी जाधव आणि सुरेखा जाधव अशी गोळीबारात जखमी झालेल्या पती पत्नीची नावे आहेत. दरम्यान, त्यांना उपचारासाठी पंढरपूर येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल केले असून सुरेखा जाधव यांची प्रकृती चिंताजनक आहे. गोळीबाराची घटना घडल्यानंतर सोलापूर ग्रामीण पोलीस दल अलर्ट झाले असून घटनास्थळी सर्वच अधिकाऱ्यांनी धाव घेतली. घटनास्थळी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी आणि त्यांच्या पथकाने भेट देऊन आरोपीच्या शोध घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

गोळीबार करून दशरथ केराप्पा गायकवाड हा संशयित फरार झाला आहे. सोलापूर पोलिसांनी संशयित आरोपीच्या शोधासाठी एक अधिकारी व १० कर्मचाऱ्यांचे पथक रवाना केले आहे. घटना स्थळाला पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर यांनी भेट देऊन पोलीस निरीक्षक शेंडगे यांना तपासा बाबत काही महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. याबाबत मोहोळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे यांनी अधिक माहिती दिली. शिवाजी पुंडलिक जाधव, सुरेखा शिवाजी जाधव या पती-पत्नीवर पिस्तूल मधून गोळ्या झाडून ठार मारण्याचा प्रयत्न झाला आहे. त्यामध्ये शिवाजी जाधव यांना १ गोळी तर सुरेखा जाधव यांना ३ गोळ्या लागल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून गोळीबार करणारा संशयित दशरथ केरू गायकवाड हा फरार झाला असल्याचे समजतंय. शिवाजी जाधव (६५) आणि सुरेखा जाधव (६०) यांच्यावर सोलापुरातील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असून सुरेखा जाधव यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळत आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शिवाजी जाधव व सुरेखा जाधव हे पती-पत्नी मंगळवारी एकादशी निमित्त पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनासाठी गेले होते. ते दर्शन आटोपून येवतीकडे येत असताना येवती- रोपळे रस्त्यावर ते आले असता दशरथ गायकवाड याने त्या पती-पत्नीवर धडाधड गोळ्या झाडल्या. त्यात ते दोघेही जखमी झाले आहेत.

## भारताने बांगलादेशला दिला जबर झटका

नवी दिल्ली : भारताच्या ईशान्येकडील सात राज्यांचा समुद्राशी थेट संपर्क नाही. ही राज्ये समुद्रासाठी बांगलादेशवर अवलंबून आहेत. या भागात चीनला गुंतवणुकीची संधी आहे; अशा स्वरुपाचे वक्तव्य बांग्लादेशच्या हंगामी सरकारचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांनी केले. चीन दौऱ्यावर असताना त्यांनी हे वक्तव्य केले. या वक्तव्याला प्रत्युत्तर म्हणून भारताने बांगलादेशची कोंडी करायला सुरुवात केली आहे. याआधी शेख हसिना सरकार असताना भारतीय विमानतळ, बंदर, रेल्वे आणि महामार्ग वापरुन बांगलादेशला आयात - निर्यात व्यापार करायला परवानगी होती. आता ही परवानगी काढून घेण्यात आली आहे. ट्रान्सशिपमेंट कार्गो सर्व्हिस बंद झाल्यामुळे बांगलादेशच्या आयात - निर्यात व्यापारावर प्रतिकूल परिणाम होणार आहे.

भारताच्या सेंट्रल बोर्ड ऑफ इनडायरेक्ट टॅक्स अँड कस्टम विभागाने एक परिपत्रक काढून बांगलादेशला दिलेली ट्रान्सशिपमेंट कार्गो सर्व्हिस बंद केल्याचे जाहीर केले आहे. ट्रान्सशिपमेंट कार्गो सर्व्हिसची परवानगी देणारे २९ जून २०२० चे परिपत्रक रद्द करण्यात आल्याचे नव्या परिपत्रकात नमूद आहे. भारताकडून मिळालेल्या ट्रान्सशिपमेंट कार्गो सर्व्हिसमुळे बांगलादेश आतापर्यंत भूतान, नेपाळ आणि म्यानमार यांच्याशी थेट व्यापार करू शकत होता. हा व्यापार आता अडचणीत सापडणार आहे.

## तहसीलदारपदी लावून देण्याचे आमिष; महिलेस १० लाखांचा गंडा

**जळगाव (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शहरातील नेहरूनगर परिसरात राहणाऱ्या एका महिलेची मुलगी तहसीलदार पदावर नोकरीला लागेल, तसेच शासकीय योजनेसाठी अर्ज भरून पैसे मिळतील, अशा आमिषाने एका महिलेची १० लाख ७३ हजार ९५० रुपयांची फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे.

या प्रकरणी रामानंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार कल्पना आत्माराम कोळी (५३) यांची आरोपी ज्योती अशोक साळुंखे (रा. मन्यारवाडा, जळगाव) हिच्याशी एका कार्यक्रमात ओळख झाली होती. पुढे दोघींमध्ये मैत्री झाली. यानंतर साळुंखे यांनी कल्पना कोळी यांना त्यांच्या मुलीला तहसीलदार पदावर नोकरी लावण्याचे आमिष दाखवले. या प्रलोभनाला बळी पडत त्यांनी वेळोवेळी रोख रक्कम व दागिने असे एकूण ७ लाख २२ हजार रुपये दिले.

त्यानंतर शासकीय योजनेसाठी अर्ज भरल्यास प्रति अर्ज १०० रुपये मिळतील, असे सांगून साळुंखे यांनी कोळी यांच्या मुलीकडून ५६० अर्ज भरवून घेतले व त्यातून ३ लाख ५१ हजार ९५० रुपये स्वतःकडे ठेवले. मात्र नोकरी व कोणतीही योजना न मिळाल्यामुळे कोळी यांनी पैसे परत मागितले असता, आरोपीने धमकी दिली आणि पैसे देण्यास नकार दिला. या प्रकारानंतर तक्रारदार कोळी यांनी रामानंदनगर पोलीस ठाण्यात धाव घेतली. त्यानुसार ज्योती साळुंखे यांच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## शिवरायांचा अपमान करणारा प्रशांत कोरटकर जामीनावर सुटला!

### कोल्हापूर सत्र न्यायालयाचा निकाल; इतिहास अभ्यासकांकडून नाराजी

कोल्हापूर : छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी अवमानकारक वक्तव्य करणाऱ्या व इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना धमकी देणाऱ्या नागपूरच्या प्रशांत कोरटकरला (झीरिहरपीं घेीरींझरी) कोल्हापूर सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे.

कोरटकर पाच दिवस पोलीस कोठडीत, तर १० दिवस न्यायालयीन कोठडीत होता. त्यानंतर ३० मार्च रोजी त्याला १४ दिवसांची आणखी न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली होती. आता त्याची जामिनावर सुटका झाली आहे.

काय आहे प्रकरण?

२४ फेब्रुवारीच्या मध्यरात्री प्रशांत कोरटकरने इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना फोन करून, छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल अवमानकारक भाषा वापरत धमकी दिली होती.

या प्रकारानंतर २५ फेब्रुवारीला सावंत यांनी कोल्हापूरच्या राजवाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनंतर २७ फेब्रुवारीला कोरटकरने एक व्हिडीओ प्रसिद्ध करून माफी मागण्याचा प्रयत्न केला. मात्र तो एक महिन्याहून अधिक काळ फरार राहिला. अखेर कोल्हापूर पोलिसांनी त्याला तेलंगणामधून अटक केली होती.

तांत्रिक कारणांवरून जामीन मंजूर; वकिलांची टीका

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना इंद्रजीत सावंत यांचे वकील असीम सरोदे म्हणाले, ज्या कलमांखाली गुन्हा दाखल आहे, त्यात जास्तीत जास्त तीन वर्षांची शिक्षा आहे. त्यामुळे तांत्रिक बाबींच्या आधारे जामीन मिळणे अपेक्षित होते. मात्र, कोरटकरने केलेल्या वक्तव्यांची गंभीरता लक्षात घेता त्याला जामीन नाकारायला हवा होता. सरोदे पुढे म्हणाले, पोलीस तपास अद्याप पूर्ण झालेला नाही, हे न्यायालयात लेखी दाखवण्यात आले असतानाही त्याला जामीन मिळणे दुर्दैवी आहे. आता कोरटकरने जामीनाच्या अटींचे उल्लंघन केल्यास आम्ही त्याचा जामीन रद्द करण्याची प्रक्रिया सुरू करू.

**कोरटकरचा नंबर मिळवण्याचीही शंका** – इंद्रजीत सावंत यांचा मोबाईल नंबर कोरटकरने कोल्हापूर पोलीस दलातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याकडून मिळवल्याची माहिती उघड झाली आहे. त्यामुळे पोलीस दलातील काही अधिकाऱ्यांची भूमिका देखील तपासाअंतर्गत येण्याची शक्यता आहे.

प्रशांत कोरटकरला जामीन मिळाल्यानंतर आता याप्रकरणी पुढे काय होते आणि कोल्हापूर पोलिसांची व न्यायालयाची भूमिका काय असेल, याकडे राज्यभरातील जनतेचे लक्ष लागले आहे.

## संपादकीय

# राजकुमार वर्धमान यांना अशी मिळाली महावीर उपाधी

कर्मकांड, अवडंबर आणि भीती यांच्या ओझ्याखाली दबलेल्या भारतीय जनमानसाला मार्ग दाखविण्यासाठी इसवी सन पूर्व सहाव्या शतकात जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांचा उदय झाला.

कर्मकांड, अवडंबर आणि भीती यांच्या ओझ्याखाली दबलेल्या भारतीय जनमानसाला मार्ग दाखविण्यासाठी इसवी सन पूर्व सहाव्या शतकात जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांचा उदय झाला. हा एक असा काळ होता, ज्या वेळी बौद्धिक उलथापालथ आणि अर्धवट ज्ञानावर आधारित आध्यात्मिक क्रांतीचा संक्रमण काळ मानला जात होता. रूढीवादी परंपरा, परस्परांमध्ये असेलेले वैमनस्य आणि सोळा महाजनपदांच्या संघ प्रमुखांद्वारे निर्मित हिंसकतेने त्रस्त भारतीय सर्वसामान्यांच्या नजरा अशा आध्यात्मिक प्रणेत्याच्या शोधात होत्या, जो त्यांना अहिंसेच्या माध्यमातून आत्मज्ञानाच्या निश्चित मार्गावर घेऊन जाऊ शकेल. अशा संक्रमण काळात क्षत्रिय कुळातील राजा सिद्धार्थ यांच्या घरी राजकुमार वर्धमान यांचा जन्म झाला.

माणसांमध्ये पसरलेला अंध विश्वास, अवडंबर आणि भीती आणि खोटेपणाच्या गर्तेत सापडलेले लोक यांना पाहून वर्धमानाचे मन दु:खी झाले. पण महत्त्वाची गोष्ट अशी की, सांसारातील सर्व आव्हानांनी राजकुमार वर्धमान यांचे आयुष्य बदलून गेले. १२ वर्षांची कठोर तपश्चर्याकेल्यानंतर वर्धमानला ज्ञानप्राप्ती झाली आणि ते महावीर झाले. महावीर म्हणजेच साधनेच्या मार्गात येणाऱ्या बाह्य बाधांवर पराक्रमासोबत विजय मिळविणारा होय. कैवल्य प्राप्तीबाबत भगवान महावीरांनी सांगितलं की, आत्म ज्ञानाचा मार्ग सर्वांसाठी शक्य आहे. पण यासाठी अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह आणि ब्रम्हचर्य यांना आत्मसात करून चित्तप्रवृत्तीचे परिशोधन करणे आवश्यक आहे. महावीर स्वामींनी जवळजवळ तीस वर्षांपर्यंत आपल्या शिक्षणाचा प्रचार-प्रसार केला आणि तीर्थंकर पार्श्वनाथ द्वारे प्रतिपादित चार व्रत- सत्य, अहिंसा, अस्तेय आणि अपरिग्रह यामध्ये पाचवे व्रत 'ब्रह्मचर्य' याचाही समावेश केला. भगवान महावीरांनी अनेकांतवाद म्हणजेच स्याद्-वादाचा सिद्धांत सांगितला. खरं पाहता भगवान महावीर यांच्या अनेकांतवादाचे दर्शन गौतम बुद्धांच्या मध्यम मार्गासारखेच आहे. ज्याच्या अंतर्गत त्यांनी अतिवादी आणि निरीश्वरवादी मत वगळता, मध्य मार्ग स्वीकारला आहे. अनेकांतवादानुसार एखाद्या वस्तूचे अनेक पैलू असतात. पूर्ण ज्ञान फक्फक्त कैवल्य-प्राप्तीमुळेच शक्य होते. कैवल्य प्राप्त करण्यासाठी भगवान महावीरांनी तीन तत्वे सांगितली- सम्यकब दर्शन, सम्यकब ज्ञान, सम्यकब चरित्र.

खरं तर, सम्यकब दर्शन सर्व प्रकारच्या कुप्रवृत्तींपासून मुक्त होण्याचे असे साधन आहे, याच्या सहवासात आल्यानंतर माणसाच्या मनात असलेला संशय आणि शंकांचे निरसन होऊ लागते आणि आत्मविश्वास दृढ होऊ लागतो दुसरे साधन आहे सम्यकब ज्ञान संसारिक बंधनातून मुक्तीच्या मार्गात सम्यकब ज्ञानाचे महत्त्व अधिक आहे कारण यांच्या अभावातच सर्व प्रकारची भौतिक कामे व्यक्तीसोबत संयुक्त होत जातात आणि बंधनाचे रूप धारण करतात. तिसरे साधन आहे सम्यकब चरित्र. याच्या अंतर्गत सच्चरित्रता आणि सदाचरण यावर विशेष भर दिला आहे. अशा प्रकारे ही तीन रत्ने सम्यकब दर्शन, सम्यकब ज्ञान, सम्यकब चरित्र यांचे पालन केल्यास मनुष्याची अस्तित्वाकडे होत असलेली प्रगती खुंटते आणि त्याची सर्व प्रकारच्या कुप्रवृत्तींपासून मुक्तता होते. याचा परिणाम म्हणून त्याला केवल अवस्थेचा भास होऊ लागतो. तीन रत्नांच्या सतत अनुशीलनाने संसारिक दु:खाचा अंत होणे शक्य होते.

## भगवान महावीरांची महान जीवन गाथा

# भगवान महावीरांचे अवघे जीवनच आपणा सर्वांसाठी प्रेरणादायक

जैनांचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीरांनी उभे आयुष्य संपूर्ण मानव जातीला सत्य आणि अहिंसेच्या मार्गावरून जाण्याचा मार्ग दाखविला. आपापसात एकजुटीने रहाण्यास शिकविले, पशुहत्येचा, जातीपातीच्या भेदभावाचा कडाडून विरोध केला. भगवान महावीरांनी मानवतेच्या कल्याणासाठी ऐहिक वैभवाचा:समस्त सुख-सोयींचा त्याग करून तप-त्यागाचा मार्ग अवलंबिला होता.

भगवान महावीरांचे अवघे जीवनच आपणा सर्वांसाठी प्रेरणादायक आहे. राजमहालात राहणाऱ्या महावीरांनी सगळ्या राजसुखाचा त्याग करून सत्याचा शोध घेतला आणि परम ज्ञानाची प्राप्ती करून घेतली त्याची जेवढी स्तुती गावी तितकी कमी आहे:या लेखातून भगवान महावीरांच्या जीवनाशी निगडीत महत्वपूर्ण गोष्टींवर प्रकाश टाकण्यात आलाय.

**महावीरांचा जन्म आणि प्रारंभिक जीवन** – ई.स. ५९९ पूर्वी वैशाली राज्यात, क्षत्रियकुंड नगरीत, इक्ष्वाकू वंशाचे राजा सिद्धार्थ आणि त्रिशला राणीच्या पोटी चैत्र महिन्यातील त्रयोदशीला भगवान महावीरांचा सामान्य बालकाच्या रुपात जन्म झाला. स्वामी महावीर हे बालवयापासून अत्यंत तेजस्वी आणि कुशाग्र बुद्धीचे बालक होते. कठीण तपोबलाच्या सहाय्याने त्यांनी आपल्या जीवनाला महान बनविले.

भगवान महावीरांना सन्मती, महावीर श्रमण, वर्धमान या नावांनी देखील ओळखलं जातं. त्यांच्या या वेगवेगळ्या नावांमागे देखील काही कथा जोडल्या गेल्या आहेत. असं म्हणतात कि त्यांच्या जन्मानंतर राज्यात खूप सुख-संपन्नता आणि वृद्धी झाली, त्यामुळे त्याचं नाव वर्धमान ठेवण्यात आलं.बालपणापासून त्यांच्यातील साहस, तेज, बल यामुळे त्यांना महावीर असं म्हंटल्या गेलं. आपल्या सगळ्या इच्छा आणि इंद्रियांवर त्यांनी विजय प्राप्त केल्यानं त्यांना ङ्गजितेंद्रङ्ग म्हंटल्या गेलं.

महावीर स्वामींचा विवाह – राजपुत्र म्हणून जन्माला आलेल्या महावीरांना संसारिक सुखाविषयी विशेष आसक्ती कधीच नव्हती, परंतु आई-वडिलांच्या इच्छेनुसार त्यांनी वसंतपूर येथील महासामंत समरवीरांची कन्या यशोदाशी विवाह केला. लग्नानंतर त्यांना प्रियदर्शनी नावाची एक कन्या देखील झाली.

भगवान महावीरांचे संन्यासी जीवन भगवान महावीरांना सुरुवातीपासून संसारिक सुखाची आसक्ती नव्हती, आई-वडिलांच्या मृत्युपश्चात त्यांना संन्यासी जीवनाची ओढ लागली होती परंतु भावाच्या विनंतीला मान देत ते काही दिवस थांबले.पुढे वयाच्या ३० व्या वर्षी महावीरांनी सर्व संसारीक मोह-मायेचा त्याग करून घर सोडण्याचा निर्णय घेतला आणि वैराग्य स्वीकारले.

घनदाट अरण्यात त्यांनी सलग १२ वर्ष कठोर तपश्चर्या केली आणि त्यांना ज्ञानाची प्राप्ती झाली. त्यानंतर त्यांची ख्याती चोहोदिशांना होऊ लागली. त्यांच्या महान उपदेशांमुळे आणि त्यांच्या ज्ञानाने प्रभावित होऊन मोठ-मोठे राजा-महाराजा त्यांचे अनुयायी झाले. आपल्या उपदेशांच्या माध्यमातून त्यांनी लोकांना प्राणीमात्रांवर दया, आपापसातील बंधुभाव, सत्य-अहिंसेचा मार्ग स्वीकारण्यास प्रेरित केलं.

**भगवान महावीर आणि गौतम बुद्ध यांच्यातील विशेष** – भगवान महावीर आणि गौतम बुद्ध हे दोघेही सुख-संपन्न परिवारात राजघराण्यात जन्माला आले होते. अनेक प्रकारची सुखं पायाशी लोळण घेत असतांना देखील दोघानाही त्याचा कधी मोह झाला नाही उलट त्यांनी सत्याच्या शोधासाठी आपल्या ऐशो-आरामी जीवनाचा त्याग केला व घनदाट जंगलात कठोर तप केलं आणि लोकांना समान उपदेश केला.



याशिवाय भगवान महावीर आणि गौतमबुद्ध यांच्यातील आणखीन एक साम्य असे की दोघांची विचारधारा देखील अहिंसेवर आधारीत होती.

भगवान महावीरांची दर्शन स्यादवाद, अनेकांतवाद, त्रिरत्न, पंच महाव्रत ही तत्व असून गौतम बुद्धांची मुख्य तत्व अष्टांगिक मार्ग, प्रतीत्यसमुत्पाद, बुद्ध कथा, अनात्मवाद, आव्याकृत प्रश्नांवर बुद्धांचे मौन आणि निर्वाण आहे. बौद्ध आणि जैन धर्मात आपल्याला बऱ्याच समानता पाहायला मिळतात. दोन्ही धर्मात सत्य, अपरिग्रह, अस्तेय, सम्यक दर्शन, सम्यक ज्ञान, ब्रम्हचर्य, अहिंसा, सम्यक चरित्र, अनिश्वरवाद, तप आणि ध्यान विद्यमान आहेत. दोन्ही धर्म मानवाला सत्य आणि अहिंसेच्या मार्गावर चालण्याचा संदेश देतात. भगवान महावीर आणि गौतम बुद्धांमध्ये साल वृक्ष, तप, अहिंसा, आय समानता आढळतात. शिवाय दोघांची कर्मभूमी ही बिहार आहे.

भगवान महावीरांची शिकवण – जैनांचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीरांनी आपल्या शिकवणुकीतून आणि उपदेशाच्या सहाय्याने लोकांना जीवन जगण्याची कला शिकवली आणि सत्य व अहिंसेचा मार्ग दाखवला.

भगवान महावीरांची शिकवणच जैन धर्माची मुख्य पंचशील सिद्धांत बनले. या सिद्धांतात सत्य, अपरिग्रह, अस्तेय, अहिंसा आणि ब्रम्हचर्य आहेत.पशुहत्या आणि हिंदू समाजात पसरलेल्या जाती व्यवस्थेचा विरोध करणारे भगवान महावीर यांच्या सिद्धांताना आणि शिकवणुकीला स्वीकारून कोणताही मनुष्य सच्चा जैन अनुयायी होऊ शकतो. जैन धर्माचे प्रमुख तीर्थंकर भगवान महावीरांची जयंती हिंदू धर्माच्या तिथीप्रमाणे चैत्र महिन्यातील शुक्लपक्षात त्रयोदशीला साजरी केली जाते. ई.स. ५९९ पूर्वी चैत्र महिन्याच्या १३ व्या दिवशी बिहार राज्यातील वैशाली इथं कुंडलपूर गावी भगवान महावीरांचा जन्म झाला होता. म्हणून त्यांच्या जन्मदिवसाला जैनधर्मीय लोक महावीर जयंती आणि जैन महापर्व म्हणून साजरा करतात. महावीर जयंतीच्या दिवशी जैन मंदिरांमध्ये अत्यंत आकर्षक पद्धतीने सजावट करण्यात येते, शिवाय जैन समुदाय या दिवशी भव्य शोभायात्रेचे आयोजन देखील करत असतं

महावीर जयंतीच्या पावन पर्वावर जैन धर्मीय लोक भगवान महावीरांनी दिलेल्या शिकवणुकीवर चालण्याचा प्रण करतात आणि त्यांच्या उपदेशाचे स्मरण करतात. भगवान महावीर जयंतीच्या दिवशी भारत सरकार तर्फे आधिकारिक सुट्टीची घोषणा करण्यात आलेली आहे. या दिवशी सगळ्या शाळा, कॉलेज, ऑफ्फिस, कोर्ट, बँक, सहीत सगळी शासकीय कार्यालये बंद असतात.

**भगवान महावीरांचे मुख्य कार्य** –अहिंसेवर महावीरांचा सर्वोच्च अधिकार असल्याने त्यांच्याप्रती सगळ्यांना अपार आदर आहे. कोणत्याही परिस्थितीत त्यांनी अहिंसेचा मार्ग सोडलेला नाही, त्यांच्या या शिकवणुकीचा महात्मा गांधी आणि रवींद्रनाथ टागोर यांसारख्या महान व्यक्तींवर मोठा प्रभाव होता.

भगवान महावीरांच्या काळात सभोवतालचे वातावरण अत्यंत अशांत होते:

सर्वदूर ब्राम्हणांचे वर्चस्व असल्याने ते अन्य जातींच्या तुलनेत स्वत:ला सर्वश्रेष्ठ समजत असत, आपल्या धार्मिक होम-यज्ञात टे प्राण्यांचा बळी देत असत. त्यांच्या या कृत्यांचा क्षत्रिय देखील विरोध करत असत.

भगवान महावीरांनी अहिंसेचे समर्थन करून मुक्या जीवांचा बळी देण्याच्या प्रथेचा कडाडून विरोध केला.

भगवान महावीरांनी संपूर्ण भारतभर भ्रमण करून आपली शिकवण लोकांपर्यंत पोहोचविली. त्यांचे तत्वज्ञान आठ विश्वासांवर आणि पाच नैतिक तत्वांवर आधारीत आहे.

अहिंसा म्हणजे हिंसा न करणे,
सत्य म्हणजे नेहमी खरे बोलणे,
अस्तेय चोरी न करणे,
ब्रम्हचर्य म्हणजे शुद्ध आचरण आणि
अपरिग्रहम्हणजे संपत्ती जमा न करणे.

**भगवान महावीरांचे निर्वाण –**

समस्त मानवजातीला सत्य आणि अहिंसेच्या मार्गावर चालण्याचा उपदेश करणारे भगवान म हावीर यांनी ई.स. ५२७ पूर्व कार्तिक महिन्यातील अमावस्येला बिहार मधील पावापुरी येथे आपल्या नश्वर शरीराचा त्याग केला आणि त्यांचे निर्वाण झाले.

या स्थळाला जैन धर्मीय त्यांच्या प्रमुख स्थळांपैकी एक मानतात:त्यांच्या निर्वाणदिनी जैन समुदाय दिवे लावतात.

भगवान महावीरांच्या निर्वाणा नंतर जवळ-जवळ २०० वर्षांनंतर जैन धर्म दिगंबर आणि श्वेतांबर अश्या दोन वेगवेगळ्या संप्रदायात विभागला गेला.

दिगंबर संप्रदायाचे जैन संत आपल्या वस्त्रांचा त्याग करतात आणि श्वेतांबर संप्रदाय पांढरे वस्त्र धारण करतात.

**स्त्रोत – इंटरनेट वरिल माहिती....**

### महावीरांचे काही प्रेरणादायक आणि अनमोल विचार

- मनुष्याला जगा आणि जगु द्या... या संदेशावर कायम रहायला हवे कुणालाही दुखं पोहोचवू नये, प्रत्येकाचे जीवन त्याच्यासाठी अनमोल आहे.
- स्वत:वर विजय प्राप्त करणे हे लाखो शत्रूंवर विजय प्राप्त करण्यापेक्षा उत्तम आहेङ्घ.
प्रत्येकाप्रती दयेचा भाव ठेवा, राग आणि घृणेने सर्वनाश होतो.
- आत्मा अजर-अमर आहे ती एकटीच येते आणि एकटीच जाते, तिला कुणीही सोबत करत नाही आणि कुणी मित्र देखील बनत नाही.
- क्रोध नेहमी अधिक क्रोधाला जन्म देतो, आणि क्षमा व प्रेम अधिक क्षमेला व प्रेमाला जन्म देते.

### जैन धर्माचे प्रमुख उत्सव

- महावीर जयंती
- पर्युषण पर्व प्रारंभ दिवस
- वर्षीतय प्रारंभ दिवस
- अक्षय तृतीया
- भगवान पार्श्वनाथ जन्मदिवस
- संवत्सरी महापर्व

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत प्रशिक्षणार्थींचा प्रशिक्षण कार्यकाळ ६ ऐवजी आता ११ माहिने

छत्रपती संभाजीनगर – कौशल्य रोजगार उद्योजकता व नावीन्यता विभागाकडून मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरु करण्यात आली आहे. प्रशिक्षणार्थी यांना सहा महिने कालावधीसाठी प्रशिक्षण देण्यात येत होते. मात्र आता मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत कार्य प्रशिक्षणार्थींचा प्रशिक्षण कार्यकाळ ६ माहिने ऐवजी ११ माहिने करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत प्रशिक्षणार्थी यांचे विद्यावेतन डीबीटीव्दारे ऑनलाईन त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षणार्थींचा प्रशिक्षण कार्यकाळ ६ महिने ऐवजी ११ महिने करण्यात आला आहे. त्यामुळे ज्या उमेदवारांनी दि. १० मार्च २०२५ किंवा त्यापूर्वी आपले सहा महिन्याचे प्रशिक्षण पूर्ण केले असेल अशा प्रशिक्षणार्थी यांना उर्वरित पाच महिने कार्य प्रशिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. या वाढीव ५ महिन्याच्या कालावधीसाठी कार्य प्रशिक्षण घेण्यास इच्छुक उमेदवार तसेच सद्यस्थितीत प्रशिक्षण घेत असलेले उमेदवार व योजनेचा नव्याने लाभ घेण्यास इच्छुक उमेदवारांची आधार पडताळणी व आवश्यक कागदपत्रे (उदा. आधार, शैक्षणिक पात्रता, वय, अधिवास प्रमाणपत्र) तपासणी करणे आवश्यक आहे.

योजनेच्या htts://www.cmyky.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवरील प्रतिज्ञापत्राचा नमुना प्रशिक्षणार्थी व आस्थापना यांनी संबंधित सहायक आयुक्त यांच्याकडे सादर करणे गरजेचे आहे. आधार व कागदपत्र पडताळणी पूर्ण झाल्याशिवाय कोणत्याही प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणासाठी रुजू करुन घेण्यात येणार नाही. तसेच, प्रत्येक प्रशिक्षणार्थी यांची नोंदणी आधार पडताळणी अनिवार्य आहे. ज्या बँक अकाऊंटला आधार लिंक आहे. तोच बँक खाते क्रमांक योजनेच्या विद्यावेतन डीबीटी साठी नमुद करणे आवश्यक आहे.

प्रशिक्षणार्थी यांनी आधार पडताळणी तसेच आस्थापना यांनी कागदपत्रे तपासणीसाठी आपल्या जिल्ह्याचे सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास रोजगार उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्याशी ३० एप्रिल २०२५ पर्यंत संपर्क साधून आवश्यक ती तपासणी करुन घ्यावी. याबाबत काही अडचण असल्यास आपल्या जिल्ह्यातील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, यांच्याशी संपर्क करावा किंवा ८०१२९७११११ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागीय आयुक्तालयाच्या उपआयुक्त श्रीमती विद्या शितोळे यांनी केले आहे.

# बसमध्ये संकट समयी बाहेर पडण्याचा मार्ग बंद

भाईदर : मीरा भाईदर महापालिका परिवहन सेवेच्या बसला मागील बाजूला काचे ऐवजी प्लायवुड लावले असल्याने संकटसमयी बाहेर पडण्याचा मार्गच बंद झाला आहे त्यामुळे प्रवाशांची सुरक्षा धोक्यात आली आहे. तसेच वाहतूक नियमाचे उल्लंघन सुद्धा होत आहे. मीरा भाईदर महापालिकेची स्वतंत्र परिवहन सेवा असून प्रवाशांच्या सेवेसाठी ७४ बसचा ताफा तसेच ३२ इलेक्ट्रिक बस सुध्दा असून त्या सर्व १८ बस मार्गावर धावतात त्यातून दररोज १ लाख प्रवासी प्रवास करत आहेत. अशी उत्कृष्ट सेवा ठाणे जिल्ह्यातच नव्हे तर राज्यातील महापालिकेत कौतुकास्पद म्हणून ओळखली जात आहे. परंतु अलीकडे वाहनांत वारंवार तांत्रिक बिघाड अधिक आढळून येत आहे. शहरातील सामाजिक कार्यकर्ते सचिन जांभळे यांना शनिवार ५ एप्रिल रोजी बस क्र. एम.एच.०४ इ.पी. ०६४० तसेच बस मार्ग क्र. २४ या बस मधून प्रवास करताना आढळून आले की, बसची मागील काच पूर्णपणे तुटल्यामुळे त्या जागेवर काच न लावता प्लायवूड लावून ती जागा पूर्णपणे बंद करण्यात आली आहे. ती काच बस चालकाला मागून येणाऱ्या वाहनाचे संकेत समोरील व दोन्ही बाजूला असलेल्या आरश्यात दिसत असतात.

तसेच ती काच म्हणजे संकट परिस्थितीत सुखरुपपणे बाहेर पडण्याचा मार्ग असतो. तसा संदेश त्या काचेवर सुद्धा लिहिलेला असतो. तीच जागा प्लायवुड लाऊन बंद केल्यामुळे प्रवाशांचा संकटसमयी बाहेर पडण्याचा मार्ग बंद झाल्याने त्यांची सुरक्षा धोक्यात आली आहे. याबाबत सचिन जांभळे यांनी महापालिका आयुक्त आणि पोलिस आयुक्त यांना तक्रारीचे निवेदन दिले आहे.

# जगाचा भारतावरील विश्वास वाढतोय : पंतप्रधान

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

भारताचे प्रयत्न आणि त्याचे परिणाम प्रेरणास्थान बनत असल्याने जगाचा भारतावरील विश्वास वाढत असून जागतिक संस्था आता भारताकडे पाहत आहेत. भारताची प्रगती इतरांसाठी मार्गदर्शक होत आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. पंतप्रधान मोदी यांनी आज नवी दिल्लीत विज्ञान भवन येथे नवकार महामंत्र दिवसाचे उद्घाटन केले आणि त्यात सहभागी झाले.

परस्परोपग्रहो जीवनम या जैन तत्वज्ञानावर भर देऊन जीवन परस्पर सहकार्यावर भरभराटीला येते, असे त्यांनी नमूद केले. याच दृष्टिकोनामुळे भारताकडून जागतिक अपेक्षाही वाढल्या असून देशाने आपले प्रयत्न अधिक तीव्र केले आहेत, असे त्यांनी नमुद केले. हवामान बदलाच्या महत्त्वाच्या मुद्द्याला संबोधित करताना, त्यांनी शाश्वत जीवनशैली हा उपाय ठरवून भारताच्या मिशन लाईफच्या प्रारंभावर प्रकाश टाकला. जैन समुदाय शतकानुशतके साधेपणा, संयम आणि शाश्वततेच्या तत्त्वांचे पालन करत आहे. अपरिग्रह या जैन तत्वाचा संदर्भ देत, त्यांनी या मूल्यांचा व्यापक प्रसार करण्याची गरज आहे, यावर भर दिला. प्रत्येकाने मिशन लाईफचे ध्वजवाहक बनण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.



उपस्थितांना संबोधित करताना त्यांनी नवकार मंत्राचा गूढ आध्यात्मिक अनुभव अधोरेखित केला तसेच मनामध्ये शांती आणि स्थैर्य आणण्याच्या त्याच्या क्षमतेवर भर दिला. शब्द आणि विचारांच्या पलीकडे जाणारी, मन आणि चेतनेत खोलवर प्रतिध्वनित होणारी शांतीची असाधारण भावना त्यांनी विशद केली. नवकार मंत्राचे महत्त्व अधोरेखित करताना मोदी यांनी त्यातील काही पवित्र श्लोक ऐकवले आणि हा मंत्र उर्जेचा एकीकृत प्रवाह असल्याचे सांगितले , जो स्थैर्य , समता आणि चेतना आणि आंतरिक प्रकाशाच्या सामंजस्यपूर्ण लयीचे प्रतीक आहे. आपले वैयक्तिक अनुभव कथन करताना , त्यांनी आपल्या अंतर्मनात नवकार मंत्राची आध्यात्मिक शक्ती कशी जाणवत आहे याबद्दल सांगितले. काही वर्षांपूर्वी बंगळुरूमध्ये अशाच एका सामूहिक जप कार्यक्रमाला उपस्थित राहिल्याची आठवण त्यांनी सांगितली जिने त्यांच्यावर कायमस्वरूपी ठसा उमटवला. पंतप्रधानांनी देशभरातील आणि परदेशातील लाखो सद्गुणी आत्म्यांचे एकात्मिक चेतनेत एकत्र येणे हा अतुलनीय अनुभव असल्याचे अधोरेखित केले. त्यांनी सामूहिक ऊर्जा आणि समन्वित शब्दांबाबत बोलताना ते खरोखरच असाधारण आणि अभूतपूर्व असल्याचे नमूद केले.

ङ्गनवकार मंत्र पठण करताना १०८ दैवी गुणांपुढे आपण नतमस्तक होतो आणि मानवतेच्या कल्याणाचे स्मरण करतो ङ्ग, असे सांगून मोदी म्हणाले की, हा मंत्र आपल्याला आठवण करून देतो की ज्ञान आणि कर्म हेच जीवनाची दिशा आहेत, गुरु हे मार्गदर्शक प्रकाश आहेत आणि मार्ग तोच आहे जो आतून निघतो. त्यांनी नवकार मंत्राच्या शिकवणींबाबत अधिक माहिती दिली जी स्वतःवर विश्वास ठेवून स्वतःचा प्रवास सुरु करण्यास प्रेरणा देतात. त्यांनी सांगितले की खरा शत्रू आपल्या आतच आहे - नकारात्मक विचार, अविश्वास, शत्रुत्व आणि स्वार्थ - आणि त्यांच्यावर विजय मिळवणे हाच खरा विजय आहे. त्यांनी अधोरेखित केले की जैन धर्म, व्यक्तींना बाह्य जगापेक्षा स्वतःवर विजय मिळिवण्यासाठी प्रेरित करतो. ङ्गस्वतःवर मिळवलेला विजय आपल्याला अरिहंत बनवतो ङ्ग, असे सांगून ते पुढे म्हणाले की नवकार मंत्र ही मागणी नसून एक मार्ग आहे - असा मार्ग जो व्यक्तींना आतून शुद्ध करतो आणि त्यांना सौहार्द आणि सद्भावनेचा मार्ग दाखवतो. नवकार मंत्र हा खऱ्या अर्थाने मानव ध्यान, साधना आणि आत्मशुद्धीचा मंत्र आहेङ्ग, असे उद्गार पंतप्रधानांनी काढले. त्यांनी त्याचा जागतिक दृष्टिकोन आणि त्याचे कालातीत स्वरूप अधोरेखित केले, जो इतर भारतीय श्रुति-स्मृति परंपरांप्रमाणेच पिढ्यानपिढ्या चालत आला आहे - आधी मौखिक, नंतर शिलालेखांद्वारे आणि शेवटी प्राकृत हस्तलिखितांद्वारे - आजही मानवतेला मार्गदर्शन करत आहे. ङ्गपंच परमेष्ठींच्या आराधनेसह , नवकार मंत्र योग्य ज्ञान, योग्य समज आणि योग्य आचरणाचे प्रतीक आहे, जो मुक्तीच्या दिशेने घेऊन जाणारा मार्ग आहे ङ्ग, असे त्यांनी अधोरेखित केले.

पूर्णत्वाच्या दिशेने घेऊन जाणाऱ्या जीवनातील नऊ तत्वांचे महत्त्व अधोरेखित करताना, मोदी यांनी भारतीय संस्कृतीत नऊ क्रमांकाचे विशेष महत्त्व नमूद केले. त्यांनी जैन धर्मातील नऊ क्रमांकाच्या महत्वाबद्दल सविस्तर माहिती देताना नवकार मंत्र, नऊ तत्वे आणि नऊ गुणांचा उल्लेख केला, तसेच नऊ निधी , नवद्वार, नवग्रह , दुर्गेची नऊ रूपे आणि नवधा भक्ती यासारख्या इतर परंपरांमध्ये त्याचे अस्तित्व स्पष्ट केले. त्यांनी अधोरेखित केले की मंत्रांची पुनरावृत्ती - मग ती नऊ वेळा असो किंवा नऊच्या पटीत असो जसे की २७, ५४, १०८ - ही संख्या नऊ द्वारे दर्शविल्या जाणाऱ्या पूर्णतेचे प्रतीक आहे. पंतप्रधानांनी स्पष्ट केले की नऊ ही संख्या केवळ गणित नाही तर एक तत्वज्ञान आहे, कारण ती पूर्णतेचे प्रतिनिधित्व करते. पूर्णत्व प्राप्त केल्यानंतर, मन आणि बुद्धी स्थिर होते आणि नवीन गोष्टींच्या इच्छेपासून मुक्त होते. प्रगतीनंतरही, व्यक्ती त्यांच्या मुळापासून दूर जात नाही आणि हेच नवकार मंत्राचे सार आहे, असे त्यांनी सांगितले.

युद्ध, दहशतवाद आणि पर्यावरणीय समस्यांसारख्या जागतिक आव्हानांवर त्याच्या मुख्य तत्त्वांद्वारे उपाय देतो, म्हणून जैन धर्म वैज्ञानिक आणि संवेदनशील आहे, यावर पंतप्रधानांनी प्रकाश टाकला. 'परस्परोपग्रहो जीवनम' हे सर्व सजीवांच्या परस्परावलंबनावर भर देणारे जैन परंपरेचे प्रतीक आहे, असे त्यांनी म्हटले आहे. जैन धर्माची अहिंसेप्रती वचनबद्धता, अगदी सूक्ष्म पातळीवरही पर्यावरण संवर्धन, परस्पर सौहार्द आणि शांतीचा एक सखोल संदेश म्हणून त्यांनी अधोरेखित केले. जैन धर्माच्या पाच प्रमुख तत्त्वांना कृतज्ञता देत त्यांनी आजच्या युगात अनेकांतवादाच्या तत्वज्ञानाच्या प्रासंगिकतेवर भर दिला. अनेकांतवादावरील विश्वास युद्ध आणि संघर्षाच्या परिस्थितींना प्रतिबंधित करतो, ज्यामुळे इतरांच्या भावना आणि दृष्टिकोन समजून घेण्यास प्रोत्साहन मिळते, असे त्यांनी सांगितले. जगाने अनेकांतवादाचे तत्वज्ञान स्वीकारण्याची गरज आहे, यावर त्यांनी भर दिला.

आजच्या माहितीच्या जगात ज्ञान मुबलक आहे, परंतु विवेकाशिवाय त्यात गंभीरता नाही. जैन धर्म योग्य मार्ग शोधण्यासाठी ज्ञान आणि ज्ञानाचे संतुलन शिकवतो यावर त्यांनी भर दिला. तरुणांसाठी त्यांनी या संतुलनाचे महत्त्व अधोरेखित केले, मानवी स्पर्श हा तंत्रज्ञानाला पूरक असला पाहिजे आणि कौशल्यांना मनाची साथ असली पाहिजे यावर भर देत नवकार महामंत्र नवीन पिढीसाठी ज्ञान आणि दिशानिर्देशाचा स्रोत म्हणून काम करू शकतो, असे नमुद केले.

नवकार मंत्राच्या सामूहिक जपानंतर मोदींनी सर्वांना नऊ संकल्प करण्याचे आवाहन केले. पहिला संकल्प 'जलसंवर्धनाचा. पाणी दुकानांमध्ये विकले जाईल या १०० वर्षांपूर्वी बुद्धी सागर महाराज यांनी केलेल्या भाकिताची आणि यांच्या शब्दांची मोदी यांनी आठवण काढत, पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे मूल्य आणि जतन करण्याची गरज यावर भर दिला. दुसरा संकल्प म्हणजे 'आईच्या नावाने एक झाड लावा'. त्यांनी अलिकडच्या काही महिन्यांत १०० कोटींहून अधिक झाडे लावल्याचे अधोरेखित केले आणि सर्वांना त्यांच्या आईच्या नावाने एक झाड लावण्याचे आणि तिच्या आशीर्वादांसारखे त्याचे संगोपन करण्याचे आवाहन केले. गुजरातमध्ये २४ तीर्थंकरांशी संबंधित २४ झाडे लावण्याच्या त्यांच्या प्रयत्नांची आठवण करत झाडांच्या अभावामुळे ते पुर्ण होऊ शकले नाही, ही अठवणही यावेळी त्यांनी काढली. 'स्वच्छता अभियान' हा तिसरा संकल्प असून प्रत्येक रस्त्यावर, परिसरात आणि शहरात स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करत सर्वांना या मोहिमेत योगदान देण्याचे आवाहन मोदी यांनी केले.

# मल्लीनाथ दिगंबर जैन मंदिर देशमुख नगर शिवाजीनगर येथे आयोजीत महारक्तदान शिबीरात २१२ रक्तदात्यांनी केले रक्तदान शिबीरास उत्स्फुर्त प्रतिसाद



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

सकल जैन समाज छत्रपती संभाजीनगर अंतर्गत भ.महावीर जन्मत्सोव समिती व श्री.१००८ मल्लीनाथ दिगंबर जैन मंदिर देशमुख नगर, शिवाजीनगर यांच्या वतीने सकाळी ९ ते २ वाजे पर्यत शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प.पु.नंम्रमती माताजी, सुदिव्यमती माताजी, सुनैमती माताजी यांची विशेष उपस्थिती होती. या शिबीरास उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. यामध्ये २१२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. तसेच यावेळी नेत्र तपासणी डॉ. पुजा विपुल गंगवाल २७० लोकांची करण्यात आली. डॉ.विशाल पाटणी यांनी १२५ लोकांची दंत तपासणी केली. या षशिबीराचे उदघाटन महासचिव महावीर पाटणी, महावीर जन्मकल्याणक महोत्सव समितीचे अध्यक्ष स्वप्नील पारख, कार्याध्यक्ष प्रतिक साहुजी, संगीता संचेती, महासचिव निलेश जैन, सारीका साहुजी, कोषाध्यक्ष बाहुबली वायकोस,ललीता साकला,मिना पापडीवाल, कार्यकम संयोजक पंकज साकला,डिंपल पगारीया,मनिषा भंसाली, सचिव प्रमोद पाटणी , सहसचिव मंजु पाटणी, अनिता पहाडे, वैशाली धोगडे, तसेच मल्लीनाथ दिगंबर जैन मंदिराचे पदाधिकारी व सकल जैन समाजाच्या मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मंगलाचरण सुनिल कासलीवाल यांनी केले तर सुत्रसंचालन नितीन छाबडा यांनी केले. यावेळी लायन्स ब्लड बॅंक व अमृता ब्लड बॅंक यांचे सहकार्य लाभले. यावेळी महासचिव महावीर पाटणी व जन्मकल्याणक महोत्सव समितीचे अध्यक्ष स्वप्नील पारख यांनी या शिबीराबददल मंदिराच्या पदाधिका-यांचे अभिनंद केले व असे सामाजिक उपकम राबवत रहा असेही सांगीतले.

यावेळी देशमुखनगर, शिवाजीनगर, अरिहंतनगर, बालाजीनगर, राजाबजार, सिडको, हडको आदी ठिकाणाहुन समाज बांधव उपस्थित होते. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी दिली. यशस्वी करण्यासाठी मल्लीनाथ दिगंबर जैन मंदिर व समाज बांधवांनी विशेष परिश्रम घेतले.



# उद्या मांगिरबाबा यात्रेनिमित्त आमदार केसरी भव्य कुस्ती स्पर्धा

वैजापूर : तालुक्यातील थोरवाघलगाव येथील मांगीरबाबा यात्रोत्सवास आज गुरुवारपासून मोठ्या उत्साहात प्रारंभ होणार आहे. यात्रेच्या निमित्ताने आमदार केसरी भव्य कुस्ती स्पर्धा आयोजित केल्या असून उद्या शुक्रवारी दुपारी स्पर्धा होणार आहे. स्पर्धेतील अंतिम विजेत्या पैलवानास उद्योजक कैलास पवार यांच्यातर्फे मानाची चांदीची गदा बक्षीस म्हणून देण्यात येणार आहे.

आज गुरुवारी सायंकाळी यात्रेच्या निमित्ताने बारा गाड्या ओढण्यात येणार आहे. त्यानंतर देवाला नैवेद्य अर्पण करून यात्रोत्सव साजरा होईल. सायंकाळी लोकनाट्य तमाशाचे आयोजन करण्यात आले आहे.उद्या शुक्रवार दुपारी ३ वाजता वैजापूर-गंगापूर महामार्गालगत थोरवाघालगाव जवळ कुस्ती स्पर्धेला सुरुवात होईल.

याप्रसंगी पै. स्वराज तामखेडे विरुद्ध पै. ऋतिक राजपूत यांच्यासह कोल्हापूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध ठिकाणच्या नामवंत पैलवानांची जंगी कुस्त्या होणार आहे. त्यामुळे कुस्ती प्रेमींनी मोठ्या संख्येने कुस्त्या पाहण्यासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन यात्रा कमिटी व थोरवाघलगाव ग्रामस्थांनी केले आहे.

स्पर्धेतील विविध गटातील कुस्ती विजेत्या पैलवानांना आमदार रमेश बोरनारे, सरपंच कैलास सातपुते, राजे मित्र मंडळ, नानासाहेब थोरात, सुनील कारभार व परसराम मोईन, आकाश अर्थमुव्हर्स, गणेश कृषी सेवा केंद्र व अष्टविनायक दूध संकलन केंद्र, संतोष राऊत, मातोश्री अर्थमुव्हर्स व जयवंती अर्थमुव्हर्स, रमेश त्रिभुवन, हंसराज एकनाथ मोईन, घनश्याम बुट्टे व वामन बुट्टे, विष्णू राऊत व विठ्ठल मोईन, अनिल मोईन, पोलीस शिपाई सागर शिंदे, संजय जाधव यांच्याकडून ३१ हजार रुपये पासून ३१०० पर्यंत रोख रक्कम स्वरूपात बक्षीस दिले जाणार आहे. कुस्ती स्पर्धेचा प्रारंभ स्वामी विश्वनाथगिरी महाराज, आमदार रमेश बोरनारे, माजी नगरसेवक साबेरभाई, माजी आमदार भाऊसाहेब चिकटगावकर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख बाबासाहेब जगताप, उद्योजक कैलास पवार, शिवसेना सर्कल प्रमुख नानासाहेब थोरात यांच्या उपस्थितीत होणार आहे. कुस्ती स्पर्धेचे समालोचन जालना येथील पैलवान शरद भालेराव हे करणार आहे. सदर स्पर्धेत पंचांचा निर्णय अंतिम राहील. कुठलीही दुखापत झाल्यास पैलवान स्वतः जबाबदार राहील. अंतिम कुस्ती निकाल लागल्यानंतर बक्षीस देण्यात येईल. नुरा कुस्ती लावण्यात येणार नाही, असे आवाहन यात्रा कमिटी व थोरवाघलगाव ग्रामस्थांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# आडगावच्या सोमनाथ भुमे यांची मुंबई महानगरपालिकेत कार्यकारी सहायक पदावर निवड

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**



फुलंब्री तालुक्यातील आडगाव (बु) येथील सोमनाथ शामराव भुमे यांनी नुकत्याच जाहीर झालेल्या मुंबई महानगरपालिकेच्या कार्यकारी सहायक पदाच्या परीक्षेत यश संपादन केले आहे. डिसेंबर २०२४ मध्ये ही परीक्षा पार पडली होती, आणि त्याचा निकाल बुधवार (दि.९) जाहीर झाला.

भुमे यांनी खडतर अभ्यास, चिकाटी व जिद्द यांच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. ग्रामीण भागातून येऊन त्यांनी मोठ्या स्पर्धेत यश मिळवून आपल्या कुटुंबाचे, गावाचे आणि जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे. मुंबई महानगरपालिकेतील कार्यकारी सहायक हे अत्यंत जबाबदारीचे पद असून, सार्वजनिक सेवेत कार्य करण्याची संधी त्यांना मिळाल्यामुळे गावात आनंदाचे वातावरण आहे.

या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. सिडको एन-६ भागातील व्यवसायिक उमेश झगरे, अमोल झगरे, योगेश जाधव यांनीही भुमे यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# प्रगतीचे मार्ग: दुबई - भारत आर्थिक भागीदारी व्यावसायिक परिसंवाद

मुंबई, दि. ०८ : दुबई वाणिज्य व उद्योग मंडळे आणि कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय), फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (एफआयसीसीआय) आणि आयएमसी चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री यांच्या सहयोगाने दुबईचे उपपंतप्रधान राजकुमार शेख हमदान बिन मोहम्मद बिन रशीद अल मकतुम आणि केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांच्या उपस्थित 'प्रगतीचे मार्ग: दुबई - भारत आर्थिक भागीदारी' या व्यावसायिक परिसंवादाचे आयोजन आज करण्यात आले होते.




यावेळी दुबई चेंबर्सचे अध्यक्ष सुलतान बिन सईद अल मन्सुरी, डीपी वर्ल्डचे चेअरमन आणि सीईओ तसेच दुबई इंटरनॅशनल चेंबरचे चेअरमन सुलतान अहमद बिन सुलेयम आणि त्यांचे शिष्टमंडळ उपस्थित होते.

या परिसंवाद मध्ये दुबई आणि भारत यांच्यातील डिजिटल इकॉनॉमी मार्गाचा आरंभ होत असल्याचे घोषित करण्यात आले. या भागीदारीचा एक नवीन टप्पा म्हणून बंगळुरूमध्ये दुबई चेंबर्सचे नवीन कार्यालय उघडण्यात येणार आहे. हे कार्यालय भारतातील डिजिटल क्षेत्रातील सहकार्याचा प्रवेशद्वार ठरेल, असे सांगण्यात आले. या परिसंवादात करण्यात आलेल्या घोषणा - 'भारत पार्क'च्या बांधकामाला आजपासून सुरुवात झाली आहे. याचा पहिला टप्पा २०२६ च्या अखेरीस पूर्ण होईल. हे पार्क भारतीय उत्पादने जागतिक खरेदीदारांसाठी एक मंच म्हणून काम करेल,विशेषतः जीसीसी देश आणि आफ्रिकेतील खरेदीदारांसाठी. 'भारत आफ्रिका सेतू'या उपक्रमाचा शुभारंभ या माध्यमातून भारत आणि आफ्रिका दरम्यान समुद्री आणि हवाई संपर्क, आणि डीपी वर्ल्डच्या लॉजिस्टिक पार्क्सच्या साहाय्याने व्यापार अधिक मजबूत होईल. भारतातील निर्यातदारांना आफ्रिकेतील ५३ देशांमध्ये व्यापारासाठी मोठे नेटवर्क आणि पायाभूत सुविधा मिळतील. डीपी वर्ल्ड आणिठखढएडलिमिटेड यांच्यात सामंजस्य करार. या कराराच्या अंतर्गत, दोन्ही संस्था जागतिक प्रकल्प विकसित करण्याच्या संधी शोधतील. व्हर्च्युअल ट्रेड कॉरिडॉर प्लॅटफफॉर्म एकत्र सुलभ सान्निध्य देईल जे कस्टम्स आणि लॉजिस्टिक्स प्रक्रियांना एकत्र आणेल. डीपी वर्ल्ड आणि कोचीन शिपयार्ड यांच्यात सामंजस्य करार. या सहकार्यामुळे शिप रिपेयर, शिप कन्स्ट्रक्शन, ऑफशोअर फॅब्रिकेशन, ऑइल व गॅस यामध्ये सहकार्य वाढेल. 'मेक इन इंडिया २०३०' आणि 'आत्मनिर्भर भारत' उपक्रमांना गती मिळेल. डीप-वॉटर पोर्टवरील कंटेनर टर्मिनलचे पूर्ण बांधकाम २०२७ पर्यंत पूर्ण होईल. हे पोर्ट भारत सरकारच्या ग्रीन पोर्ट गाइडलाइन्सनुसार तयार केले जात आहे.

यावेळी केंद्रीय मंत्री गोयल परिसंवादामध्ये मनोगत व्यक्त करताना म्हणाले, मुंबई आणि दुबई यांच्यात केवळ क्रिकेटच नव्हे, तर अनेक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संबंध आहेत. यंदा आपल्या कुटुंबाच्या भारतभेटीच्या १०० वर्षांचं स्मरणीय वर्ष आहे ङ्ग शेख सईद यांच्या १९२४ मधील भेटीला १०० वर्ष पूर्ण झाली आहेत. भारत आणि युएई यांचे नाते हे केवळ व्यापारी संबंध नसून, विश्वासावर उभं असलेलं एक भागीदारीचं आदर्श उदाहरण आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि युएईतील सर्व प्रमुख नेत्यांमधील विश्वासाचं मूर्त स्वरूप आहे.

युएईमध्ये उभ्या राहत असलेल्या स्वामीनारायण मंदिराबद्दलही आम्ही आपले अत्यंत ऋणी आहोत. शिक्षण क्षेत्रातील वाढती भागीदारी ङ्ग दुबईत आयआयटी सुरू झालं आहे, आता आयआयएम येत आहे, आणि लवकरच आयआयएफटीही सुरू होईल. ही केवळ सुरुवात आहे. शिक्षण, व्यापार, संस्कृती, ऊर्जा, लॉजिस्टिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, हरित ऊर्जा, अन्न सुरक्षा, आणि आणखी अनेक क्षेत्रांत संधी उपलब्ध आहेत. भारताची जीडीपी दुपटीने वाढली आहे. २०२५ अखेर भारत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल, आणि २०२७ पर्यंत तिसरी बनेल. यामुळे 'विकसित भारत'चं स्वप्न आणि युएईचं ५० वर्षांचं व्हिजन हातात हात घालून पुढे जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# आंबेडकर जयंती महासमितीच्या मध्यवर्ती कार्यालयाचे आज उदघाटन

## उदघाटन सोहळ्यास उपस्थित राहण्याचे महासमिती अध्यक्ष विजय मगरे यांचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

निराला बाजार, ओल्ड केएफसी बिल्डिंग, मोतीवाला कॉम्प्लेक्स येथे असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर १३४ वी जयंती उत्सव महासामितीच्या मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन सर्व धर्मीय धर्मगुरु यांच्या हस्ते गुरुवारी (दि.१०) सायंकाळी ६ वाजता होईल. अशी माहिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३४ वी जयंती उत्सव महासमितीचे संस्थापक अध्यक्ष राजूभाऊ शिंदे, उत्सव महासमितीचे नवनर्वाचित अध्यक्ष विजय मगरे मुख्य सल्लागार मिलिंद दाभाडे, मुख्य समन्वयक गौतम खरात, गौतम लांडगे, कार्याध्यक्ष महेंद्र सोनवणे, स्वागतध्यक्ष चंद्रकांत हिवराळे, वरिष्ठ उपाध्यक्ष संतोष भिंगारे यांनी दिली.




मध्यवर्ती कार्यालयाच्या सोहळ्याप्रसंगी मान्यवरांची उपस्थिती राहणार असुन यावेळी इतर मागास बहुजन कल्याण, दुग्ध विकास, व अपारंपरिक ऊर्जा विभाग मंत्री अतुल सावे, जिल्ह्याचे पालकमंत्री तथा सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, खासदार संदीपान भुमरे, डॉ. भागवत कराड, डॉ.कल्याण काळे, विधानपरिषद विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, माजी मंत्री राजेंद्र दर्डा, माजी खा.इम्तियाज जलील, माजी खा. चंद्रकांत खैरे, आमदार प्रदीप जैस्वाल, अब्दुल सत्तार, सतीश चव्हाण, विक्रम काळे, प्रशांत बंब, रमेश बोरणारे, विलास भुमरे, संजना जाधव, अनुराधा चव्हाण, जिल्हा गणेश महासंघाचे संस्थापक अध्यक्ष पृथ्वीराजभाऊ पवार, अजिंक्य देवगिरी प्रतिष्ठान चे अध्यक्ष विनोद पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष अभिजित देशमुख, शिवसेना जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ, माजी महापौर नंदकुमार घोडले, भाजप शहराध्यक्ष शिरीष बोराळकर, मनसे जिल्हाध्यक्ष सुमित खांबेकर, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, मनपा आयुक्त जी. श्रीकांत आदींची प्रमूख उपस्थिती राहील.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबडेकर यांची १३४ वी जयंती यंदा समाजाभिमुख विविध उपक्रमांनी येत्या १४ एप्रिल रोजी साजरी करण्यात येणार असून यानिमित्ताने विविध सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. छत्रपती संभाजी नगरच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून असलेल्या छत्रपती संभाजी नगर शहरातील भीम जयंतीचा जन्मोत्सव सोहळा यावर्षी अविस्मरणीय ठरणार आहे. हा सोहळा मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात क्रांती चौक तसेच भडकल गेट येथे साजरा करण्यात येणार असल्याचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव महासमिती चे नवनिर्वाचित अध्यक्ष विजय मगरे यांनी स्पष्ट केले.

या उदघाटन सोहळ्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन महासमितीचे संस्थापक अध्यक्ष राजूभाऊ शिंदे, उत्सव महासमितीचे नवनर्वाचित अध्यक्ष विजय मगरे मुख्य सल्लागार मिलिंद दाभाडे, मुख्य समन्वयक गौतम खरात, गौतम लांडगे, कार्याध्यक्ष महेंद्र सोनवणे, स्वागतध्यक्ष चंद्रकांत हिवराळे, वरिष्ठ उपाध्यक्ष संतोष भिंगारे संस्थापक समितीचे ऍड. रमेशभाई खंडागळे, दिनकर ओंकार, प्रकाश निकाळजे, रामभाऊ पेरकर, कृष्णा बनकर, राजू आमराव, रुपचंद वाघमारे, भगवान रगडे, बंडू कांबळे. जालिंदर शेंडगे, राहुल सोनवणे. उपाध्यक्ष राहुल सावंत, इंजि. मुकुल निकाळजे, विनोद बनकर, कृष्णा भंडारे. कार्यालयीन सचिव विजय वाहूळ, विशाल दाभाडे, मिलिंद बनसोडे, डॉ. निलेश आंबेवाडीकर, कार्यकारिणी सदस्य राहुल साळवे, दामूअण्णा कांबळे, भरत दाभाडे, संदीप जाधव, राजू भालेराव, भूषण हिवाळे, नाना म्हस्के, प्रकाश जाधव, मनोज जाधव, प्रकाश गायकवाड, माणिक साळवे, नंदू बनकर, बालाजी सूर्यवंशी, नागेश जावळे, डॉ. कुणाल खरात, संदेश शेळके. महिला कार्यकारिणीच्या रेखा राऊत, रेखा मुळे, विजया बनकर, प्रसिद्धी प्रमुख सचिन लिला सुखदेव अंभोरे, यांनी महासमितीच्या वतीने केले आहे.

# भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव निमीत्त आज भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन

## भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सवनिमीत्त भ.महावीर स्तंभ विद्युत रोषणाईने उजाळला



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

सकल जैन समाज अंतर्गत भगवान महावीर जन्मकल्याण महोत्सव समिती २०२५ च्या वतीने भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव निमीत्त धार्मिक कार्यकमाचे आयोजन करण्यात आले असुन सर्व प्रथम सकाळी राजाबजार जैन मंदिर, महावीर भवन, सिडको एन ३ पासुन सकाळी ६ वाजता वाहन रॅली निघणार आहे तदनंतर भगवान महावीर चौक बाबा पेट्रोल पंप येथे सकाळी ७ वाजता धर्मध्वजोराहन जन्मकल्याणक महोत्सव समितीचे अध्यक्ष स्वप्नील पारख,कार्याध्यक्ष प्रतिक साहुजी, संगीता संचेती, महासचिव निलेश जैन, सारीका साहुजी, कोषाध्यक्ष बाहुबली वायकोस,मि'ालाल कांकरीया, ललीता साकला,मिना पापडीवाल, कार्यकम संयोजक पंकज साकला,डिंपल पगारीया,मनिषा भंसाली, सचिव प्रमोद पाटणी , सहसचिव मंजु पाटणी, मिनाश्री उदगीरकर, अनिता पहाडे, वैशाली धोगडे, विकास जैन, प्रशांत देसरडा, झुंबरलाल पगारिया,अनिलकुमार संचेती,कौशीक सुराणा, मुकेश साहुजी,अमोल पुर्णेकर, रतिलाल मुगदिया, ॲड.डी.बी.कासलीवाल, डॉ.प्रकाश झांबड विलास साहुजी,संजय संचेती,रवि मुगदिया,मदनलाल आच्छा,वृषभ कासलीवाल,विनोद बोकडिया,निलेश सावलकर, भारती बागरेचा,राजेश मुथा, निलेश पहाडे, करफणा साहुजी, भावना से'ीया, मंगल पारख, कविता अजमेरा, मधु जैन, मेघा सुगंधी, प्रकाश अजमेरा, इंदरचंद संचेती, महेंद्र जैन, रफ्फराज सुराणा, आनंद दुग्गड, हर्षल साहुजी, प्रफुल्ल सोनटक्के, नरेंद्र अजमेरा, पियुष कासलीवाल, सकल जैन समाजाच्या मान्यवरांच्या हस्ते भगवान महावीर चौक येथे धर्मध्वजारोहन होईल तदनंतर ७.१५ वाजता उत्तमचंद जैन छात्रालय येथे ध्वजारोहन होईल तदनंतर गुरफगणेशनगर येथे ध्वजारोहन होईल तसेच सकाळी ८ वाजता पै'णगेट येथुन भव्य रथयात्रा प्रारंभ होईल. तसेच रथयात्रेमध्ये शंखेश्श्वर पार्श्वनाथ जैन मंदिर सिडको,गोडीजी पार्श्वनाथ जैन मंदिर जोहरीवाडा,विमलनाथ जैन मंदिर जाधवमंडी यांचे रथ शोभायात्रेत राहणार आहे तसेच राजाबजार जैन मंदिर,सराफा व हडको जैन मंदिर,सकल सैतवाल दिगंबर जैन समाज या मंदिराची पालखी शोभायात्रेत राहणार आहे. हि शोभायोत्रा पै'णगेट, टिळकपथ, मछलीखडक, सिटीचौक, शहागंज,गांधीपुतळा,राजाबजार मार्गाने जैन मंदिरात भगवंताचा महामस्तकाभिषेक होईल तसेच भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव समिती, यांच्या संयुक्त विदयमाने १० एप्रिल रोजी सकाळी ९ ते दुपारी २ पर्यत महारक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. प्रकल्पप्रमुख डॉ.प्रकाश झांबड व डॉ. प्रकाश पाटणी हे आहे. तसेच १० एप्रिल रोजी समाधिस्त १०५ सुव्रतमाताजी यांच्या आर्शीवादाने विजय, जितेंद्र, नितीन, नविन, पाटणी परिवार यांच्या वतीने घाटी येथे अन्नदान करण्यात येणार आहे.

शहरातील विविध भागातुन विविध मंडळातर्फे सजीव देखावे पुढील विषयांवर आधारित असणार आहे यात स्वच्छ भारत,आत्महत्याग्रस्त शेतकरी,पुरग्रस्तांना केलेली मदत व त्यांचे केलेले पुर्नवसन,शहीद जवानांना दिलेली मदत,पर्यावरण,पाणीबचाव,बेटी बचाव, पशुधन बचाव,वृक्षारोपण आदी विषयांवर सजीव देखावे,लेझीम पथक,झांझ पथक,महिला व्दारे विविध घोषणा वाक्ये होणार आहे.या शोभायात्रेत श्री.शंखेश्श्वर पाश्र्वनाथ जैन जिनालय सिडको एन-३ रथ, श्री.पाश्र्वनाथ खंडेलवाल दिगंबर जैन मंदिर राजाबजार पालखी, श्री.अग्रवाल दिगंबर जैन मंदिर सराफा श्री.सैतवाल दिगंबर जैन समाज भाजीबाजार येथुन भव्य पालखी तसेच श्री आनंदजी कल्याणजी ट्रॅस्ट चे श्री गोडीजी पाश्र्वनाथ जैन श्श्वेतांबर मंदिर जोहरीवाडा येथुन रथ व छत्रपती संभाजीनगर श्री.जैन श्श्वेतांबर मुर्तीपुजक संघ रथ, विमलनाथ जैन मंदिर जाधवमंडी यात्रेत सामील होतील तसेच रथयात्रा मार्गावर महावीर भक्तांनी व विविध मंडळांनी थंड पेय,बिस्कीट, चॉकलेट,आईस्किम जलपान व्यवस्था ठेवण्यात आली आहे. हजारोंच्या संख्येने महावीर भक्ताने उपस्थित रहावे असे आवाहन जन्मोउत्सव समितीचे अध्यक्ष स्वप्नील पारख यांनी केले असल्याची माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली.

# सांस्कृतिक संबंध परिषदेने मित्र देशांमध्ये भारतीय सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करावे - राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

## भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचा ७५ वा स्थापना दिवस साजरा

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

गेल्या काही वर्षांमध्ये भारताचे जागतिक पटलावर महत्व वाढले असून देशोदेशींचे राष्ट्रप्रमुख भारताशी व्यापार, संयुक्त उपक्रम यांसह शिक्षण व सांस्कृतिक संबंध वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. सांस्कृतिक विविधता भारताचे बलस्थान असून सांस्कृतिक संबंध परिषदेने विविध देशांमध्ये भारताच्या सांस्कृतिक महोत्सवांचे आयोजन करून विविध देशांशी संबंध आणखी दृढ करण्यात योगदान द्यावे असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

राज्यपाल राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचा ७५ वा स्थापना दिवस नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स (एनसीपीए), मुंबई येथे संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते.

अलीकडेच चिलीचे अध्यक्ष भारत दौऱ्यावर येऊन गेले. भारतीय संस्कृती व परंपरांबद्दल आपण वाचले असून येथील सांस्कृतिक विविधता आपल्याला प्रत्यक्ष अनुभवायची असल्याचे त्यांनी आपणास सांगितले असे नमूद करुन भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेने देशाचे परराष्ट्र संबंध



अधिक दृढ करण्यात महत्त्वाची भूमिका बजवावी असे राज्यपालांनी सांगितले.

भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेने अनेक देशांमधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करून भारतात उच्च शिक्षण घेण्यास सहकार्य केले याबद्दल आनंद व्यक्त करून देशोदेशींचे हे सर्व माजी विद्यार्थी आज त्यांच्या देशात भारताचे सांस्कृतिक राजदूत झाले आहेत.

भारतीय शिष्यवृत्तीमुळे अफगाणिस्तान सह अनेक मित्र देशातील विद्यार्थ्यांना भारतात उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळाली असे राज्यपालांनी यावेळी सांगितले.

यावेळी प्रसिद्ध नृत्यांगना आदिती भागवत यांच्या 'लय की कहानी' या नृत्याधारित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाला समाजसेविका व कला इतिहासकार फिरोजा गोदरेज, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. रवींद्र कुलकर्णी, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, प्रोटेक्टर ऑफ इमिग्रंट्स राहुल बर्हत, भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेच्या विभागीय संचालिका रेणू पृथियानी, राज्यपालांचे उपसचिव एस राममूर्ती, विविध देशांचे मुंबईतील वाणिज्यदूत, आयसीसीआर शिष्यवृत्ती प्राप्त विविध देशांचे विद्यार्थी आदी उपस्थित होते.

# भारत नौदलासाठी २६ राफेल खरेदी करणार, ६३ हजार कोटींचा करार होणार

नवी दिल्ली : भारत नौदलासाठी २६ राफेल लढाऊ विमानांची खरेदी करणार आहे. हा ६३ हजार कोटी रुपयांचा करार आहे. भारत आणि फ्रान्स यांच्यात नौदलासाठीच्या राफेलकरिता करार होणार आहे. या करारांतर्गत फ्रान्सची दसॉल्ट कंपनी भारतीय वैमानिकांना नौदलासाठीचे राफेल चालवण्याचे प्रशिक्षण देणार आहे. तसेच नौदलाच्या तंत्रज्ञांना राफेलच्या देखभाल दुरुस्तीचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. भारतात नौदलासाठीच्या राफेलची निर्मिती केली जाणार आहे. एप्रिल महिन्याच्या अखेरीस फ्रान्सचे संरक्षण मंत्री सेबॅस्टियन लेकोर्नू भारत दौऱ्यावर येतील. त्यावेळी भारत आणि फ्रान्स यांच्यात नौदलासाठीच्या राफेलकरिता करार होणार आहे. करार झाल्पापासून पाच वर्षांच्या आत फ्रान्सकडून भारताला राफेलचा पुरवठा होणार आहे.

राफेल एम हे जगातील सर्वात प्रगत नौदल लढाऊ विमानांपैकी एक म्हणून ओळखले जाते. भारत फ्रान्सकडून अत्याधुनिक अशी २२ सिंगल सीटर आणि चार डबल सीटची व्यवस्था असलेली राफेल लढाऊ विमानं खरेदी करणार आहे. या विमानांचा ताफा भारताच्या आयएनएस विक्रांत या विमानवाहक नौकेवर तैनात केला जाणार आहे.

शत्रूकडून असलेली आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी तसेच भारताची स्वरसंरक्षणाची आणि लढण्याची क्षमता वाढवण्यासाठी राफेल हे सर्वाधिक उपयुक्त विमान आहे. यामुळेच भारत सरकारने नौदलासाठी राफेल खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. याआधी भारत सरकारने हवाई दलासाठी राफेल विमानांची खरेदी केली. हवाई दलाच्या चांगल्या अनुभवानंतर आता नौदलासाठीच्या राफेलची खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

आधुनिक लँडिंग गिअर, फोल्डिंग विंग्स, प्रतिकूल स्थितीत डेक लँडिंग आणि टेलहूकचा सामना करण्यासाठी अंडरकॅरेज, उड्डाण सुरू असताना हवेतच इंधन भरुन घेण्याची क्षमता, दोन इंजिन अशा वेगवेगळ्या वैशिष्ट्यांमुळे नौदलाचे राफेल दीर्घ काळ आकाशात राहून काम करण्यास सक्षम आहे.

# फुले -भिमोत्सव- २०२५- आढावा बैढक मुख्य आयोजक डॉ.अरुण शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा आपल्या सर्वांच्या सहकार्याने व पाठबळाने फुले -भिमोत्सव-२०२५ या अभिनव उपक्रमाचे आयोजन केले आहे तरी आज आढावा बैठक डॉ.आंबेडकर विधी महाविद्यालय, नागसेनवन, छत्रपती संभाजी नगर येथे संपन्न झाली यावेळी उपस्थित समिती सदस्यांनी आपली मते, सूचना मांडल्या. त्यामध्ये विविध समित्या स्थापन करण्यात आल्या.

दि.११ एप्रिल २०२४ ते १४ एप्रिल पर्यंत भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, यामध्ये ११ तारखेला महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त संविधान गौरव आदर्श गौरव पुरस्कार देण्याचे योजिले आहे या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून माजी शिक्षणाधिकारी एम.के.देशमुख, उद्घाटक पोलीस उपायुक्त नितीनजी बगाटे, उपाध्यक्ष माजी आमदार एम.एम.शेख, प्रमुख पाहुणे सहसंचालक तथा अध्यक्ष व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ छ.संभाजीनगर अनिल साबळे, शिक्षणाधिकारी माध्यमिक संभाजीनगर, अश्विनी लाटकर यांच्या उपस्थितीत मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र येथे पुरस्कार प्राप्त शिक्षकांना पुरकाराने गौरविण्यात येणार आहे. दिनांक १३ रोजी संविधान जागर अभियानांतर्गत संविधान वाचन, भडकल गेट येथे अध्यक्ष खासदार जालना डॉ. कल्याण काळे, उदघाटन शेख युसूफ, राजेन्द्र दर्डा, आमदार राजेश राठोड, एम. के.देशमुख, उत्तम सिंग पवार, एम.एम.शेख, प्रा.मोहन देशमुख, माजी आमदार अनिल पटेल, अशोक सायना, विलास औताडे, हेमताई पाटील, प्रशांत इंगळे, डॉ.जफर खान, प्रकाश मुगधीया, किरण पाटील डोनगावकर, ऍड. इकबलसिंग गिल, भाऊसाहेब जगताप, खालेद पठाण, रेखाताई राऊत, अनिल पटेल, डॉ.जितेंद्र देहाडे, नामदेव पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत वाचन करण्यात येणार आहे.

दिनांक १४ एप्रिल २०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त क्रांतीचौक येथे संविधानाच्या उद्देशिकेचे वाटप माजी कुलगुरू डॉ.सुधीर गव्हाणे, उदघाटक सुभाष लोमटे, राजेन्द्र दर्डा, आमदार राजेश राठोड, एम. के.देशमुख, उत्तमसिंग पवार, एम.एम.शेख, प्रा.मोहन देशमुख, माजी आमदार अनिल पटेल, अशोक सायना, विलास औताडे, हेमताई पाटील, प्रशांत इंगळे, डॉ.जफर खान, प्रकाश मुगधीया, किरण पाटील डोनगावकर, ऍड. इकबलसिंग गिल, भाऊसाहेब जगताप, खालेद पठाण, रेखाताई राऊत, अनिल पटेल, डॉ.जितेंद्र देहाडे, नामदेव पवार, विद्याताई घोरपडे आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

संपूर्ण कार्यक्रमाला पद्माकर कांबळे, देवानंद वानखडे, प्रा.शिलवंत गोपनारायण, डॉ.मिलिंद आठवले, अमोल सरदार, रेखाताई राऊत, रंजना हिवराळे, शिरीष कांबळे, विनोद कांबळे, आनंद दाभाडे, रणदि आराख, चेतन वानखडे, देवा भाऊ मोरे, राहुल पाटील, साहेबराव त्रिभुवन, गजानन पवार, विजयकुमार मोरे आदी मान्यवर उपस्थित राहून परिश्रम घेऊन हा कार्यक्रम यशस्वी करणार आहेत.

शहरातील तमाम जनतेला व बुद्धिजीवी नागरिकांनी ह्या सम्पूर्ण कार्यक्रमाला उपस्थित राहून सहकार्य करावे असे आव्हाहन मुख्य आयोजक डॉ.अरुण शिरसाट यांनी केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • RNI No. MAHMAR/2023/87816